पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या साररव्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76



मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों ना कमानों को, ना तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

● संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र ● गोवा ●कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २६५ वा ● शुक्रवार, ता. १४ मार्च २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



३ ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649



रयत समाचार पोर्टल
Scan QR Code

रयत समाचार चॅनल
Scan QR Code

इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code


घरी वृत्तपत्रं असायला हवं.
टीव्ही, मोबाईल, सगळं
असलं, तरी घरात आपण
अनेक वस्तू घेत असतो
ज्या कदाचित जगण्याला
लागत नाहीत, मात्र घराला
एक आत्मिकता प्राप्त करून
देतात, शोभा वाढवतात...
त्यातलीच एक वस्तू म्हणजे
वृत्तपत्र !
कसाही असो,
पेपर लावा !

– प्रथमेश पाटील
इंडी जर्नल

# वनतारा संशयाच्या भोवऱ्यात

## वन्यजीव बचाव पुनर्वसन केंद्राचा अहवाल आणि ऑडिट सादर करण्याची मागणी



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

जामनगर येथे रिलायन्स फाउंडेशन ने उभारलेल्या वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्राचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच उद्घाटन केले.वनतारा नावाने असणाऱ्या या वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्राचा केवळ देशातच नव्हे तर जगभरात गाजावाजा झाला आहे. आणि याच वेळी वनतारातील वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्राच्या कारभाराबाबतही जगभरात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. दक्षिण आफ्रिकेच्या वन्यजीव प्राणी संरक्षण संस्थेने वनतारा मधील प्राण्यांसंदर्भात संशय व्यक्त करताना, तेथील वन्यजीवांच्या संदर्भात सविस्तर माहिती आणि ऑडिट जाहीर करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे वनतारा संशयाच्या भोवऱ्यात आला आहे. प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी यांचे चिरंजीव अनंत अंबानी यांचे प्राणी प्रेम सर्वांनाच ठाऊक आहे. त्यांनी काही वर्षांपूर्वी जामनगर येथील प्रशस्त जागेत देशातील जखमी आणि असाह्य हत्तींवर उपचार करण्याचे केंद्र सुरू केल्याचे सांगितले होते. त्याच जागेत आता जगातील सर्वात मोठे वन्यजीव बचाव व पुनर्वसन केंद्र सुरू करण्यात आले आहे.शेकडो एकर प्रशस्त जागेत उभारलेल्या वनतारात जगभरातील हजारो प्राणी ठेवण्यात आलेले आहेत. वनतारात दोनशेहून अधिक वाघ आणि चित्ते, ३०० हून अधिक हत्ती, चार हजाराहून अधिक पशुपक्षी असल्याची माहिती पुढे आली आहे.वनतारात जिराफ,चिंपाझी याचबरोबर भारतात न आढळणारे अनेक विदेशी पशुपक्षी ,प्राणी पाहायला मिळतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वनिताचे उद्घाटन केले, त्यानंतर संपूर्ण जगभरातच वनताराला मोठी प्रसिद्धी मिळाली. आणि त्यानंतर वनतारातील वन्यजीव प्राण्यांसंदर्भात उलट सुलट चर्चाही सुरू झाली. देशाबरोबरच जगभरातील काही संस्थांनी वनतारातील प्राण्यांसंदर्भात प्रश्न उपस्थित केले आहेत.यामध्ये प्रामुख्याने दक्षिण आफ्रिकेतील वन्यजीव प्राणी संरक्षण संस्थेने, दक्षिण आफ्रिकेच्या जंगलातील ५६ चित्ते,७० वाघ व अन्य काही वन्य प्राणी वनतारात कसे पोहोचले? याबाबत सविस्तर अहवाल आणि ऑडिट जाहीर करावा अशी मागणी केली आहे. त्यानंतर अनेक संस्था व प्राणी दया संघाकडून वनतारातील प्राण्यांसंदर्भात प्रश्न उपस्थित केले जात आहेत. भारतात वन्य प्राण्यांचा संदर्भात कडक कायदे आणि नियम आहेत. देशात न्यायालयाच्या परवानगी विना खासगी राणी संग्रहालय उभारतो येणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर परदेशातून आपल्या देशात वन्यप्राणी आणण्यासाठी परवानगी आवश्यक असते. राष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण संपूर्ण देशातील प्राणी संग्रहालयातील कामावर बारीक लक्ष ठेवून असते. त्यामुळे वनतारातील प्राण्यांसंदर्भातही राष्ट्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाला निश्चितच माहिती असावी. अनंत अंबानी यांनी देशात अनेक जंगलात जखमी अवस्थेत वन्यप्राणी आढळतात. त्यांचा बचाव करुन या ठिकाणी उपचारासाठी आणले जात आहे असा दावा केला होता. अनंत अंबानी यांच्या दाव्यात सत्यता असेल तर निश्चितच त्यांचे काम कौतुकास्पद मानावे लागेल.मात्र केवळ देशातीलच नव्हे तर विदेशातीलही अनेक प्राणी वनतारात दिसून येत आहेत.अनंत अंबानी यांनी देश आणि विदेशातील प्राण्यांना वनतारात आणताना संबंधित खात्याची परवानगी घेतली आहे का ?. वन्यजीव संरक्षण कायदा आणि नियमांचे पालन केले आहे का? का याचे आता उत्तर अनंत अंबानी यांना द्यावे लागणार आहे. जामनगर येथील ज्या जागेवर वनतारा उभारण्यात आला आहे. त्याच्या शेजारी रिलायन्सची देशातील सर्वात मोठी रिफायनरी आहे. रिफायनरी मुळे या भागातील हवामान दूषित असल्याचे सांगितले जाते. प्रदूषित हवामान असलेल्या भागामुळे वनतारातील प्राण्यांना धोका नाही का? अशा अनेक प्रश्नांची मालिका आता निर्माण होत आहे.

# पाच वर्षांत एकही बालविवाह नाही– ठाकूर

## कर्नाटक सर्वाधिक बालविवाह

**पणजी । प्रतिनिधी**


देशात २०१८ ते २०२२ दरम्यान वर्षाला सरासरी ७७२ बालविवाह झाले आहेत. असे असले तरी वरील कालावधीत गोव्यात एकही बालविवाह झालेला नाही. तसेच ईशान्येकडील बहुतेक राज्यात देखील एकही बालविवाह झालेला नाही. केंद्रीय महिला आणि बालकल्याण राज्यमंत्री सावित्री ठाकूर यांनी राज्यसभेत दिलेल्या लेखी उत्तरातून ही माहिती मिळाली आहे. याबाबत खासदार रजनी पाटील यांनी अतारांकित प्रश्न विचारला होता. उत्तरात दिलेल्या माहितीनुसार, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार विविध राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशात नोंदवलेल्या गुन्ह्यांची माहिती माहिती राष्ट्रीय गुन्हे विभागाने जमा केली आहे. २०१८ ते २०२२ दरम्यान देशात एकूण ३८६१ बल विवाह झाले. यादरम्यान गोव्यासह अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम, नागालँड आणि सिक्कीममध्ये देखील बालविवाह झाले नाहीत. वरील कालावधीत कर्नाटकमध्ये सर्वाधिक म्हणजेच ८५६ बालविवाह झाले. याची वार्षिक सरासरी १७१ इतकी होती. कर्नाटकनंतर आसाम (६५९), तामिळनाडू (५१४), पश्चिम बंगाल (४६२), महाराष्ट्र (२६४), तेलंगणा (२२९), ओडिशा (१७८), हरियाणा (१४४), बिहार(७७), आंध्र प्रदेश (६९) या राज्यांचा क्रमांक लागतो. केंद्र शासित प्रदेशात दिल्ली येथे सर्वात जास्त १० बाल विवाह झाले. तर चंडीगढ येथे ४, पुद्दूचेरी येथे एक बाल विवाह झाला. कायद्यानुसार राज्य सरकार बाल विवाह रोखण्यासाठी विषे अधिकाऱ्यांची नियुक्ती करू शकते. केंद्र सरकारने राज्यांना अशा अधिकाऱ्यांची संख्या वाढवण्यास सांगितले असल्याचे उत्तरात म्हटले आहे. केंद्राकडून विशेष अभियान उत्तरात म्हटले आहे, बाल विवाह रोखण्यासाठी केंद्र सरकारने नोव्हेंबर २०२४ मध्ये बाल विवाह मुक्त भारत हे अभियान सुरू केले आहे. यानुसार केंद्राच्या पोर्टलवर बालविवाह विषयी माहिती देता येऊ शकते. या पोर्टलवर बालविवाह विरोधात जागृती देखील केली जात आहे.

# वेठबिगार मुक्तीसाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता – रेवन्नानाथ भिसले

## आयजेएम व सीएसआरडीचा संयुक्त जनजागृती कार्यक्रम

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जागतिक सामाजिक न्याय दिन व वेठबिगार प्रथा निर्मूलन स्मरण दिनाचे औचित्य साधून सीएसआरडी - समाजकार्य व संशोधन संस्था व इंटरनॅशनल जस्टिस मिशन (), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्यकर्ते व विद्यार्थ्यांसाठी दोन सत्रांमध्ये कार्यक्रम पार पडला. पहिल्या सत्रामध्ये कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत व माजी समाज कल्याण अधिकारी यांच्या मार्फत विद्यार्थ्यांना व समाज कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये सामाजिक न्यायाच्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करत असणाऱ्या समाज कार्यकर्त्यांना सन्मानित करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. दिल्ली येथील ज्येष्ठ प्राध्यापक व समाजकार्याच्या राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय भट्ट यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक आयुक्त, कामगार विभागाचे रेवन्नानाथ भिसले, माजी समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे गणेश चिंचोळे, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे आदी मान्यवर उपस्थित होते. दिल्ली येथील ज्येष्ठ प्राध्यापक व समाजकार्याच्या राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय भट्ट यांनी अध्यक्षीय भाषणात समाजकार्य आणि कायद्याच्या परस्परसंबंधांवर प्रकाश टाकला. मानवी अधिकारांचे होणारे उल्लंघन थांबविण्यासाठी समाज कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असून कामगार कल्याणाच्या क्षेत्रामध्ये समाज कार्यकर्त्यांनी संवेदनशीलपणे काम करण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. कामगार कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त रेवन्नाथ भिसले यांनी कामगारांचे हक्क व पुनर्वसन योजनांबद्दल माहिती दिली. वेठबिगारी प्रथा निर्मूलनासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती उपस्थित त्यांना दिली. कायद्यातील तरतुदी स्पष्ट करत त्यांनी वेठबिगारी निर्मूलनासाठी सामूहिक प्रयत्न यांची आवश्यकता असल्याचे प्रामुख्याने नमूद केले. माजी समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी यांनी बंधुआ मजुरांच्या पुनर्वसनातील अडचणी आणि उपाययोजना स्पष्ट केल्या. तसेच समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती आपल्या अनुभवांच्या आधारे दिली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे गणेश चिंचोले यांनी अंधश्रद्धा, सामाजिक प्रथा आणि बंधुआ मजुरी यामधील परस्परसंबंध उलगडून सांगितले. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अंधश्रद्धा आपण थांबवण्याची गरज आहे, असे आवर्जून सांगितले. सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी प्रास्ताविकामध्ये कार्यक्रम आयोजनामागील पार्श्वभूमी सांगत बंधुआ मजुरी निर्मूलनाचे ऐतिहासिक व समकालीन महत्त्व अधोरेखित केले. आयजेएम सारखी संस्था मानवीहक्काच्या क्षेत्रामध्ये करत असलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली. सध्याच्या परिस्थितीमध्ये मानवीहक्कांच्या उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणामध्ये वाढत असून सामाजिक न्यायाचा प्रश्न समाजाला भेडसावत आहे, त्यामुळे समाज कार्यकर्ते तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांनी आयजेएम सारख्या संस्थांचे हात बळकट करून शासनाच्या सोबतीने समाजामधील या कुप्रथा निर्मूलनासाठी भरीव योगदान देण्याची गरज असल्याचं मत व्यक्त केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आयजेएमच्या कार्यपद्धती, सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका, आणि बंधुआ मजुरी निर्मूलनातील आव्हाने याविषयी प्रश्न विचारले. सर्व मान्यवरांनी विस्तृत उत्तरे देऊन विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यात योगदान देण्यास प्रेरित केले. या कार्यक्रमामुळे बंधुआ मजुरी निर्मूलनाच्या कायदेशीर, सामाजिक आणि धोरणात्मक पैलूंवर सखोल चर्चा झाली. शासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थी या विषयावर अधिक जबाबदारीने विचार करतील आणि कृतीशील भूमिका घेतील अशी अपेक्षा या कार्यक्रमाने निर्माण केली. सुत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले तर डॉ. विजय संसारे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. जेमोन वर्गीस, डॉ. प्रदीप जारे, आसावरी झपके, वैशाली पठारे यांच्यासह कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले







# लेखी आश्वासनानंतर संभाजी ब्रिगेडचे उपोषण स्थगित

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तालुक्यातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून पाझर तलावांतून होणारा अनाधिकृत पाणीउपसा बंद करण्यासाठी संभाजी ब्रिगेड सातत्याने प्रयत्नशील आहे. यासाठी ता. ०३ मार्च रोजी तहसिल कार्यालय श्रीगोंदा येथे शेळ्या मेंढ्या शह धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनानंतर प्रशासनाकडून कारवाई सुरु करण्यात आली आणि दिवसाचा पाणी उपसा बंद करण्यात आला. परंतु रात्रीच्या वेळी होणारा पाणी उपसा बंद करण्यासंदर्भात प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर ता. १२ मार्च रोजी संभाजी ब्रिगेड चे तालुकाध्यक्ष शाम जरे यांनी पंचायत समिती श्रीगोंदा येथे उपोषण सुरू केले तसेच काळ्या फिती लावून प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यात आला. यावेळी शेतकरी आघाडी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष दिलीप आबा वाळुंज, युवक तालुकाध्यक्ष सुहास गाडेकर, आनंदा दरेकर आदी सह अनेक गावातील शेतकरी उपस्थित होते. रात्री होणारा पाणी उपसा संदर्भात कारवाई करण्यासाठी पंचायत समिती तसेच तहसील प्रशासनाच्या वतीने विशेष पथक स्थापन करून कारवाई करण्यात येणार असल्याचे यावेळी गटविकास अधिकारी तसेच तहसीलदार यांनी लेखी दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

> **पाणी प्रश्न हा अत्यंत महत्वाचा असून गरज वाटेल तेव्हा वेळोवेळी यासाठी पाठपुरावा तसेच आंदोलन करत राहील.**
>
> **– शाम जरे**
> (तालुकाध्यक्ष संभाजी ब्रिगेड)

# डॉ.अभय, डॉ. राणी बंग यांना यशवंतराव चव्हाण पुरस्कार

## गडचिरोलीतील आरोग्यसेवेसाठी समर्पित कार्याचा गौरव



**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

"महाराष्ट्राला मद्यनीती आणि तंबाखूमुक्तीची तातडीची गरज आहे," असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक आणि आरोग्य संशोधक डॉ. अभय बंग यांनी केले. वैद्यकीय क्षेत्रातील जागतिक स्तरावर प्रतिष्ठित संशोधन करणाऱ्या डॉ. राणी आणि डॉ. अभय बंग यांना सन २०२४ चा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. यशवंतराव चव्हाण यांच्या ११२व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. अभय बंग म्हणाले, "समाजाच्या प्रश्नांवर संशोधन करून उपाय शोधण्याचे कार्य आम्ही गडचिरोलीत सुरू केले. दारूबंदीची मागणीही जनतेतूनच आली आणि आम्ही शासनाकडे त्याचा पाठपुरावा केला. आमच्या कार्याचे खरे श्रेय आदिवासी जनतेलाच जाते." गडचिरोलीतील आरोग्य सेवेपासून महिलांच्या सक्षमीकरणापर्यंत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या दांपत्याच्या योगदानाची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे. 'सर्च' संस्थेच्या माध्यमातून त्यांनी गडचिरोलीसारख्या नक्षलप्रभावित भागात मूलभूत आरोग्यसेवा पोहोचवल्या आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव करताना त्यांना रुपये पाच लाख, मानपत्र, शाल आणि स्मृतिचिन्ह अशा स्वरुपाचा पुरस्कार देण्यात आला. मुंबईतील महात्मा गांधी फाउंडेशनच्या बुक डेपोच्या कार्यासाठी त्यांनी हा निधी देऊ केला. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष विख्यात अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी बंग दांपत्याच्या संशोधनकार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली. डॉ. काकोडकर म्हणाले, "बालमृत्यू, न्यूमोनिया आणि आदिवासी आरोग्यासंबंधी डॉ. बंग यांनी केलेले संशोधन अभूतपूर्व आहे. त्यांचे योगदान समाजासाठी प्रेरणादायी आहे." यावेळी यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी बंग दांपत्याच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक करताना सांगितले, "चव्हाण साहेबांच्या समाजसेवेचा वसा डॉ. राणी आणि डॉ. अभय बंग पुढे नेत आहेत. त्यांच्या कार्याने गडचिरोलीतील आरोग्य आणि जनजागृतीमध्ये आमूलाग्र बदल घडला आहे." यावेळी 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' या मराठी पुरस्काचा अनुवाद असलेल्या 'माय एनलायटेनिंग हार्ट डिसिज" या डॉ. अभय बंग लिखित ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच डॉ. राणी बंग प्रकृती अस्वास्थ्यामुळे प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नसल्या तरी त्यांनी दृक्श्राव्य माध्यमातून पुरस्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.यशवंतराव चव्हाण सेंटरचे उपाध्यक्ष अरुणभाई गुजराथी यांनी स्वागतपर भाषणात संस्थेच्या तीन दशकांच्या कार्याचा आढावा घेतला. केंद्राचे सरचिटणीस हेमंत टकले यांनी पुरस्कार मानपत्राचे वाचन केले. याप्रसंगी निवड समितीचे सदस्य विवेक सावंत, तसेच चव्हाण सेंटरच्या कोषाध्यक्ष अदिती नलावडे, चव्हाण सेंटरचे विश्वस्त दिलीप वळसे पाटील, जीवनराव गोरे, बी. के. अगरवाल, जयराज साळगावकर, फरीदा लांबे, माजी महापौर विधी सल्लागार निर्मला सामंत-प्रभावळकर, प्रकाशक रामदास भटकळ चव्हाण सेंटरचे पदाधिकारी, इतर सदस्य आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता बाळसराफ यांनी केले. राष्ट्रगीताने समारोप झाला.